भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१०३/२०२०
उपविभागीय अधिकारी वि. दुर्गाबाई वगैरे

## आदेश नि.१४ वर

१. प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र.१ हिने कै.वासी निवृत्ती गांवडे याचे कायदेशिर वारस यांना या प्रकरणात गैरअर्जदार म्हणुन जोडण्यासाठी केला आहे. गैरअर्जदार क्र.२ ने अर्जास किरकोळ हरकत घेतली आहे. भुसंपादन अधिकारी यांनी वारसा दाखला प्राप्त केल्याशिवाय सदर व्यक्तीना गैरअर्जदार म्हणुन जोडता येणार नाही असे नमुद केले आहे.

२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. नविन येवु इच्छीनारे व्यक्ती हे कै.निवृत्ती गांवडे यांचे कायदेशिर वारस आहेत याबाबत स्पष्टपणे नकार विरोधी पक्षकाराने दिलेला नाही. सबब ते कायदेशिर वारस आहेत असे गृहीत धरून पुढील निर्णय राखुन ठेवुन त्यांना या भुसंपादन याचिकेत समाविष्ट करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. सर्व प्रस्तावीत पक्षकार हे सज्ञान आहेत. सबब त्यांना न्यायहितास्तव पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे.त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तावित पक्षकारांना गैरअर्जदार म्हणुन समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या प्रमाणे अर्जात अर्जदाराने दुरूस्ती करावी.

२. गैरअर्जदार क्र.१ ने स्वता सदर पक्षकारास हजर ठेवावे अथवा त्यांना त्याच्यावर नोटीसची बजावणी करावी.

दि.०२/०८/२०२१

( पी.पी.देशपांडे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम.

भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.१०३/२०२०
उपविभागीय अधिकारी वि. दुर्गाबाई वगैरे

## आदेश नि.१८ वर

१. प्रस्तुतचा अर्ज गैरअर्जदार क्र.२ हिने कै.वासी निवृत्ती गांवडे याचे कायदेशिर वारस यांना या प्रकरणात गैरअर्जदार म्हणुन जोडण्यासाठी केला आहे. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जास हरकत घेतली आहे की ते गैरअर्जदार क्र.२ चे वारस असल्याने त्यांना सर्वांना मिळुण १/५ हिस्सा मिळणार आहे म्हणुन त्यांना पक्षकार म्हणुन जोडणे आवश्यक नाही. भुसंपादन अधिकारी यांनी म्हणणे दिले नाही.

२. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. नविन येवु इच्छीनारे व्यक्ती हे कै.निवृत्ती गांवडे यांचे कायदेशिर वारस आहेत याबाबत स्पष्टपणे नकार विरोधी पक्षकाराने दिलेला नाही. सबब ते कायदेशिर वारस आहेत असे गृहीत धरून पुढील निर्णय राखुन ठेवुन त्यांना या भुसंपादन याचिकेत समाविष्ट करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. संबंधीत प्रस्तावीत पक्षकारांना भुसंपादन मोबदल्यामध्ये किती हिस्सा आहे याचा विचार हा अर्ज निकाली करतांना आवश्यक नाही. सर्व प्रस्तावीत पक्षकार हे सज्ञान आहेत. सबब त्यांना न्यायहितास्तव पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तावित पक्षकारांना गैरअर्जदार म्हणुन समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या प्रमाणे अर्जात अर्जदाराने दुरूस्ती करावी.

२. गैरअर्जदार क्र.१ ने स्वता सदर पक्षकारास हजर ठेवावे अथवा त्यांना त्याच्यावर नोटीसची बजावणी करावी.

दि.०२/०८/२०२१

( पी.पी.देशपांडे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम.